महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १९८ वा | दिनांक : २७/०५/२०२५ | वार : मंगळवार

## छगन भुजबळ हे पंतप्रधान झाले तरी आम्ही स्वागत करू : माणिकराव कोकाटे



**पंढरपुर :** राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचा नुकताच मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला आहे. त्यानंतर आता त्यांच्याकडे नाशिकचे पालकमंत्री पद जाण्याची देखील चर्चा सुरू आहे. तर मुख्यमंत्र्यांनी ठरवले तर छगन भुजबळ उपमुख्यमंत्री देखील होतील असे भाजप नेते व मंत्री गिरीश महाजन यांनी म्हटले होते. यावर आता कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी देखील चिमटा काढला आहे.

छगन भुजबळ हे उपमुख्यमंत्रीच काय ते पंतप्रधान झाले तरी आम्ही त्याचे स्वागत करू, असा उपरोधक टोला माणिकराव कोकाटे यांनी लगावला आहे. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे हे आज पंढरपूर येथे विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी आले होते. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

नाशिकच्या पालकमंत्री पदावर प्रश्न विचारला असता ते म्हणाले, आम्ही कोणीही कुठलीही इच्छा व्यक्त केलेली नाही. त्यासंदर्भात निर्णय घेण्याचा अधिकार मुख्यमंत्र्यांना आहे. मुख्यमंत्री जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल. त्यामुळे मी काही भाष्य करत नाही. तसेच माणिकराव कोकाटे यांच्या कोट घालण्यावरून राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी टीका केली होती. यावर देखील माणिकराव कोकाटे यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

रोहित पवार यांनी केलेल्या शेरेबाजीवर बोलताना माणिकराव कोकाटे म्हणाले, मी आज नाहीतर पहिल्यापासून कोट घालतो. माझ्या महाराष्ट्रातील शेतकरी देखील कोट घालण्या लायक व्हावा, त्याची आर्थिक परिस्थिती व राहणीमान सुधारावे ही माझी इच्छा आहे. समजा रोहित पवारांना असे वाटत असेल की, मला कोट नाही, शेतकऱ्यांना कोट नाही आणि कृषिमंत्रीच कोट घालतात तर आम्ही त्यांनाही कोट देऊ, असा टोला त्यांनी लगावला.

दरम्यान, सध्या महाराष्ट्रात जोरदार पाऊस पडत आहे. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. राज्यात सरासरी १२० मिमी पाऊस झाला असल्याने सर्वच ठिकाणच्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकारी आणि कृषी अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत, अशी माहिती माणिकराव कोकाटे यांनी दिली आहे.

## देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वात महाराष्ट्र पुन्हा नंबर १ बनेल : अमित शहांचे विधान



**नांदेड :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे नांदेड येथे आयोजित विशाल जाहीर सभेत उपस्थितांशी संवाद साधला. अमित शहा म्हणाले, नांदेड गुरु गोविंद सिंग यांची भूमी आहे, इथून पाकिस्तानपर्यंत आवाज पोहोचेल असा प्रचंड आवाज आला पाहिजे असे म्हणत 'भारत माता की जय'च्या घोषणा देण्यात आल्या. तसेच देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र पुन्हा एकदा नंबर १ बनेल, असा विश्वास देखील अमित शहा यांनी यावेळी व्यक्त केला आहे.

अमित शहा म्हणाले, देवेंद्र फडणवीस एकमेव असे आहेत जे पाच वर्षे काम करून पुन्हा निवडून आले आहेत. तसेच यावेळी भाजपचे कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उल्लेख करताना अमित शहा म्हणाले, मंचावर उपस्थित भाजपचे कार्यकारी अध्यक्ष व भावी प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण. त्यामुळे भाजपचे भावी अध्यक्ष रवींद्र चव्हाण असणार यावर शिक्कामोर्तब झाला आहे.

पुढे बोलताना अमित शहा म्हणाले, मराठवाड्यात देवेंद्र फडणवीस यांनी एक मोठे कार्यक्रम सुरू केला आहे. येथील दुष्काळी भागांना पाणीपुरवठा करण्याचा. २०१९ मध्ये ४० हजार कोटींच्या निधीतून मराठवाडा वॉटर ग्रिड प्रोजेक्ट चालू केला. ११ प्रमुख बांधांना पाईपलाईनने जोडून मराठवाड्याच्या प्रत्येक गावात पाणी पोहोचवण्याचे काम सुरू केले आहे. मधल्या काळात धोका देत आघाडी सरकार सत्तेवर आली आणि त्यांनी संपूर्ण काम थांबवले. आता देवेंद्र भाऊ पुन्हा मुख्यमंत्री बनले आहेत, या ५ वर्षात मराठवाड्याच्या प्रत्येक गावात पाणी पोहोचवण्याचे काम करणार आहे. सम्राट अशोकाच्या काळापासून नेहमीच दुष्काळ सहन करणारा हा प्रदेश पाण्याने बहरून येईल.अमित शहा म्हणाले, मोदीजींनी महान मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचे काम केले आहे. एवढ्या वर्षांपासून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची मागणी केली जात होती. शरद पवार एवढे वर्ष केंद्रात होते परंतु त्यांनी मराठी भाषेसाठी काहीच केले नाही. मोदींनी मराठी भाषेला अभिजात भाषा दर्जा देण्याचे काम केले आहे. येत्या दिवसात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र पुन्हा एकदा नंबर १ बनेल. मोदींनी ठरवले आहे की २०४७ मध्ये विकसित भारत बनेल आणि मला पूर्ण विश्वास आहे की छत्रपती शिवाजी महाराजांची ही भूमी, टिळक आणि सावरकरांच्या या भूमीचे सर्वात मोठे योगदान असेल. देशात सर्वात आधी विकसित महाराष्ट्र बनेल, असा विश्वास अमित शहा यांनी व्यक्त केला.

## महाराष्ट्रात आत्तापर्यंत कोरोनामुळे ४ रुग्णांचा मृत्यू

**मुंबई :** महाराष्ट्रात कोरोना रुग्णांची संख्या वाढत असून राज्यात सध्या २०९ सक्रिय रुग्ण उपचार घेत आहेत. राज्यात आतापर्यंत कोरोनामुळे चार रुग्णांचा मृत्यू झाल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे. विशेष म्हणजे या चारही रुग्णांना पूर्वीपासूनच मधुमेह, उच्च रक्तदाब यांसारख्या गंभीर आजारांचा त्रास होता, असे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे. राजधानी मुंबईतही कोरोनाच्या ३५ रुग्णांची नोंद झाली आहे. महाराष्ट्रात सध्या एकूण २४० कोरोना रुग्णांची नोंद झाली आहे. त्यामुळे राज्य प्रशासन सजग झाले असून नागरिकांनाही आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कोरोनाचा धोका पुन्हा एकदा देशात डोके वर काढताना दिसत आहे. गेल्या काही दिवसांपासून कोरोनाचे रुग्ण वाढत असल्याने चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) दिलेल्या माहितीनुसार NB.१.८.१ आणि LF.७ हे दोन नवीन व्हेरिएंट्स दिसून येत आहेत. भारत सरकारच्या आरोग्य विभागाने २६ मे रोजी प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार सध्या देशभरात १ हजारहून अधिक सक्रिय कोरोना रुग्ण आहेत. कोरोना साथीच्या दोन मोठ्या लाटा पार पडल्यावर, जनजीवन काही प्रमाणात पूर्वपदावर येत असतानाच पुन्हा एकदा या आजाराने झपाट्याने पाय रोवण्यास सुरवात केल्याचे चित्र दिसत आहे.

केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ या राज्यांमध्येही कोरोनाचा प्रादुर्भाव वाढताना दिसतो आहे. देशातील सर्वाधिक सक्रिय रुग्ण केरळमध्ये आहेत. केरळमध्ये कोरोनाबाधितांचा आकडा हा ४३० वर पोहोचला आहे, तर दुसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्र आहे. महाराष्ट्रात २०९ सक्रिया कोरोन रुग्ण आहेत. देशाची राजधानी दिल्लीमध्ये १०४ कोरोनाचे सक्रिय रुग्ण आढळून आले आहेत. तर कर्नाटकात ४७ आणि पश्चिम बंगालमध्ये ११ कोरोनाचे सक्रिया रुग्ण आहेत.

देशभरात आतापर्यंत ७ संशयित कोरोना रुग्णांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील चार, केरळमधील दोन तर कर्नाटकमधील एका व्यक्तीचा समावेश आहे. मात्र या रुग्णांचा मृत्यू हा कोरोनामुळेच झाला की अन्य काही कारणांमुळे याची पुष्टी अद्याप आरोग्य विभागाकडून करण्यात आलेली नाही, त्यांच्या मृत्यूचे कारण तपासले जाते आहे. या रुग्णांना इतर काही आजार देखील होते, अशीही माहिती समोर येत आहे.

भारतातील अनेक राज्यांमध्ये नवीन कोविड-१९ प्रकरणांमध्ये वाढ होत असताना, देशात NB.१.८.१ आणि LF.७ हे दोन नवीन प्रकार आढळून आले आहेत. ही माहिती केंद्र सरकारच्या एजन्सी इंडियन SARS-CoV-२ जीनोमिक्स कन्सोर्टियम (Insacog) च्या नवीनतम डेटावरून प्राप्त झाली आहे.

तथापि, WHO ने त्यांना चिंतेचे प्रकार मानले नाही परंतु त्यांना देखरेखीखाली असलेल्या प्रकारांमध्ये वर्गीकृत केले आहे. चीनसह इतर आशियाई देशांमध्ये कोविडच्या वाढत्या प्रकरणांमध्ये हाच प्रकार दिसून येत आहे. तथापि, A४३५S, V४४५H आणि T४७८I सारख्या NB.१.८.१ चे स्पाइक प्रोटीन उत्परिवर्तन इतर प्रकारांपेक्षा वेगाने पसरतात. कोविडविरुद्ध विकसित झालेली प्रतिकारशक्ती देखील त्यांच्यावर परिणाम करत नाही.

कोविडचा JN.१ प्रकार भारतात सर्वात सामान्य आहे. चाचणी दरम्यान अर्ध्याहून अधिक नमुन्यांमध्ये हा प्रकार आढळतो. यानंतर, BA.२ (26 टक्के) आणि ओमिक्रॉन सबलाइनेज (20 टक्के) प्रकारांची प्रकरणे देखील आढळतात.

JN.१ हा ओमिक्रॉनच्या BA२.८६ चा एक प्रकार आहे. ऑगस्ट २०२३ मध्ये ते पहिल्यांदा दिसले. डिसेंबर २०२३ मध्ये, WHO ने ते 'इंटरेस्ट व्हेरिएंट' म्हणून घोषित केले. त्यात सुमारे ३० उत्परिवर्तन आहेत, जे रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत करतात.

अमेरिकेतील जॉन्स हॉपकिन्स विद्यापीठाच्या मते, JN.१ इतर प्रकारांपेक्षा अधिक सहजपणे पसरतो, परंतु तो फार गंभीर नाही. जगाच्या अनेक भागांमध्ये हा सर्वात सामान्य प्रकार आहे.

JN.१ प्रकाराची लक्षणे काही दिवसांपासून ते आठवडे टिकू शकतात. जर तुमची लक्षणे बराच काळ टिकली तर तुम्हाला दीर्घकाळ कोविड असू शकतो. ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये कोविड-१९ ची काही लक्षणे बरी झाल्यानंतरही कायम राहतात.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २७ मे २०२५


# डॉ. संभाजी खराट यांच्या पुस्तकाचे आज प्रकाशन




**छत्रपती संभाजीनगर :** दिवंगत डॉ. संभाजी खराट लिखीत वैधव्याची समस्या आणि मुक्तीची दिशा या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मंगळवारी २७ मे रोजी सायंकाळी साडेपाच वाजता आयोजित करण्यात आला आहे. एमजीएम विद्यापीठातील आर्यभट्ट हॉलमध्ये हा सोहळा होत असून या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.सत्यशोधक डॉ. संभाजी खराट मित्रमंडळ, ग्रंथाली प्रकाशन आणि सर्व परिवर्तनवादी संघटना यांच्या वतीने हा पुस्तक प्रकाश सोहळा आयोजित केला आहे. यावेळी ज्येष्ठ विचारवंत व एमजीएम विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. सुधीर गव्हाणे, ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. प्रल्हाद लुलेकर आणि एमजीएम विद्यापीठाच्या स्त्री व लिंगभाव अभ्यास आंतरविद्या अभ्यास शाखा विभागातील प्रा.डॉ. मंजुश्री लांडगे या पुस्तकावर भाष्य आणि मांडणी करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सत्यशोधक विचारवंत प्रा. सुदाम चिंचाणे यांची उपस्थिती राहणार आहे. प्रकाशन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन वर्षा संभाजी खराट, कॉ. एस.बी. टाकळखेडे, प्रा.प्रभाकर गायकवाड यांनी केले आहे.

# ज्ञानदान विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा २६ वर्षानंतर स्नेह मेळावा उत्साहात संपन्न..



मुरूम, ता. उमरगा येथील ज्ञानदान विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांच्या स्नेह मेळाव्या प्रसंगी गुरुवर्य व माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी व अन्य.

**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** शिक्षक-विद्यार्थ्यांच्या नात्यांचा भावस्पर्शी संगम, बालपणीच्या आठवणींना तेजोमय उजाळा....मुरूम, ता. उमरगा, ता. २६ (प्रतिनिधी) : येथील ज्ञानदान विद्यालयातील इयत्ता दहावीच्या बॅच १९९९ चा स्नेहमेळावा रविवारी (ता. २५) रोजी उत्साहात आणि भावनांच्या भरगच्च वातावरणात शहरातील मालपाणी मंगल कार्यालयात पार पडला.

पावसाच्या पार्श्वभूमीवर शाळेऐवजी बंद सभागृहात हा सोहळा आयोजित करण्यात आला. उपस्थितांचे पुष्पवृष्टीने स्वागत करण्यात आले आणि दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमात “एक शिक्षक – एक विद्यार्थी” या संकल्पनेखाली अनेकांनी आपल्या मनोगतांद्वारे जुन्या आठवणी जागवल्या. बालपणीच्या खोडकर क्षणांपासून ते शिक्षकांच्या शिकवणीपर्यंत अनेक क्षणांना उजाळा देताना अनेकांनी संत साहित्य, राष्ट्रपुरुषांचे पराक्रम आणि समाजातील महानायिकांच्या संघर्षाचे प्रेरणादायी दाखले दिले.

या स्नेहसंमेलनात तत्कालीन मुख्याध्यापक नागाप्पा करपे यांच्यासह माणिक लूल्ले, शंकरराव माने, राजशेखर खुणे, प्रकाश रोडगे, मुख्याध्यापक गुरप्पा कुंभार यांचा विद्यार्थ्यांनी सन्मान केला. प्रमुख पाहुणे माजी नगरसेवक चंद्रशेखर मुदकण्णा व प्रभाकर मदने यांनीही आपले विचार मांडले. विद्यार्थ्यांनी गाणी, किस्से, शाळेतील आठवणी शेअर करत पुन्हा एकदा ‘शाळकरी’ दिवस जगले. कार्यक्रमाच्या शेवटी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले.

शाळेने घडवलेले हे विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत कार्यरत असले तरी, त्या दिवशी प्रत्येकजण मनाने पुन्हा विद्यार्थीसारखा होत एकमेकांशी प्रेमाने, आत्मीयतेने भेटले. या स्नेहमेळाव्याने ज्ञानदान विद्यालय ही केवळ एक शिक्षणसंस्था नसून ती जीवनमूल्यांची शिदोरी आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेश वडदरे यांनी स्नेहसंमेलनाची कल्पना आणि तयारी यावर प्रकाश टाकत सर्वांचे स्वागत केले. सूत्रसंचालन दिनेश बडूरे तर आभार नहिरपाशा मासूलदार यांनी मानले.







महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २७ मे २०२५

# बसव प्रतिष्ठाणच्या वतीने २७ व्यक्तीचा बसवरत्न पुरस्कार देऊन सन्मान







## महात्मा बसवण्णा यांनी दिलेल्या मानव धर्माचा संदेशानुसार बसव प्रतिष्ठाणच कार्य - शरण पाटील

**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** क्रांतिसूर्य विश्वगुरू महात्मा बसवेश्वर यांनी १२ व्या शतकात मानवता धर्माचा संदेश देत अनुभव मंटपच्या माध्यमातून सर्व धार्मियांना एकत्रित एकत्रित आणून जातभेद नष्ट करून समाजाच्या उन्नतीसाठी त्यांनी योगदान दिला आणि त्याच तत्वावर बसव प्रतिष्ठाण कार्य करत असल्याचे मत शरण पाटील यांनी व्यक्त केले.

धाराशिव जिल्ह्यातील मुरूम येथे बसव प्रतिष्ठाण अखिल भारतीय सामाजिक संघटनेचे वतीने श्री महात्मा बसवेश्वर जयंती उत्सवानिमित्त विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना राज्यस्तरीय बसवरत्न पुरस्कार देऊन २७ व्यक्तीना सन्मानित करण्यात आला व त्याचबरोबर जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांना प्राथमिक स्वरूपात शालेय साहित्याचा वाटप कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी ते बोलत होते. बसवरत्न पुरस्कार सोहळ्याचे हे ११ वर्ष होते. याप्रसंगी शाहीर रमेश खाडे यांचा श्री महात्मा बसवण्णा पोवाडा संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण बसवराज पाटील होते. तर प्रमुख अतिथी म्हणून मा. सह संचालक साखर आयुक्तालय पुणे डी. आय. गायकवाड,विठ्ठलसाई कारखाना संचालक विठ्ठलराव बदोले, उद्योजक बालाजी सुरवसे, नगर परिषद मुरूम मुख्याधिकारी सचिन भुजबळ, माजी नगराध्यक्ष रशीद शेख, बसप्पा वळसंग,शाहीर रमेश खाडे, बसव प्रतिष्ठाण अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे आदींची उपस्थिती होती. प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या पूर्णाकृती पुतळयाला पुष्पहार अर्पण करून द्विपप्रज्वलण, राष्ट्रगीत, शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आले.

पुढे बोलताना पाटील म्हणाले थोर समाजसुधारक महात्मा बसवण्णा यांचे विचार सर्व धर्म समभावाचे होते. लोकशाही आद्यजनक म्हणून ही त्यानं संबोधले जाते असे प्रतिपादन त्यांनी यावेळी करून पुरस्कृत्याना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी विठ्ठलराव बदोले यांनी बोलताना बसव प्रतिष्ठाण चे कार्य कौतुकास्पद असून त्यांच्या सामाजिक कार्याला मर्यादा नाहीत म्हणूनच आज या व्यासपीठाच्या माध्यमातून विविध धर्मीय,विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीचा सन्मान ते गेले ११ वे वर्षापासून करत असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

यावेळी डी. आय. गायकवाड, सुरवसे, भुजबळ आदिनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण ठाकूर, प्रास्ताविक डॉ. रामलिंग पुराणे तर आभार प्रा. डॉ. सौ. मनीषा नागिले यांनी आभार मानले. यावेळी असंख्य महिला भगिनीं, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाप्रसादानंतर कार्यक्रमाचे सांगता संपन्न झाले. डिंगबर सोनटक्के, महेश लोणी, मल्लिनाथ सगरे,विजय घोडके, अमित ढाले, सागर कोळी, उमेश पुराणे, शुभम पुराणे, आकाश वगरे आदिसह समाज बांधवानी परिश्रम घेतला.विशेष सत्कार बसव प्रतिष्ठाण अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त "महाराष्ट्ररत्न" पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांना मुरूम येथील धनगर समाज बांधवाच्या वतीने शरण पाटील यांच्या हस्ते काठी आणि घोंगडे भेट देऊन सत्कार करण्यात आला.

बसवरत्न पुरस्कृत्यांची यादीश्रीराम सुभाष कुलकर्णी, मुरूम- सामाजिक,संतोष विलासराव तगरखेडे, निलंगा- आरोग्य सेवा,अशोक सुऱ्याबा आलदर, सांगोला- सामाजिक-बालाजी विश्वनाथ सुरवसे, धाराशिव- पत्रकार,शेषेराव अंकुश लवटे, कोरेगाव वाडी- सामाजिक,संतोष मधुकर महिमकर सांगोला- सामाजिक क्षेत्र,अविनाश गुंडेराव काळे,उमरगा- पत्रकार,कांतराव हणमंतराव मंडले, बेरडवाडी- सामाजिक,बाळकृष्ण भारत साळुंके, धाराशिव- प्रशासकीय,पंडित बाबुराव मूदकण्णा,मुरूम- व्यापार, अॅड.फरहीन खान-पटेल, उमरगा- विधिज्ञ,सचिन महादेव भुजबळ, वडगाव- प्रशासकीय,प्रदीप गुरुनाथ गव्हाणे,मुरूम- सर्फमित्र,विजय गणेश सावतर, जागजी ता.जि. धाराशिव- संगीत, अॅड.एस पी इनामदार, केसरजवळगा-विधिज्ञ क्षेत्र, पंकज बबन बनसोडे,मुरूम- व्यापार, बाबासाहेब मल्लिनाथ पाटील, कोथळी- कृषी,बालाजी अजिनाथ सुरवसे, भूम- उद्योजक, आप्पासाहेब धानप्पा मुंडासे, मुरूम-सामाजिक, अभिजित महादेव लोके, अक्कलकोट- सामाजिक क्षेत्र, श्रीमती सविता संभाजीराव मुरूमकर, मुरूम- शैक्षणिक, रमेश खाडे-सोलापूर-शाहीर, अजित पंडितराव पाटील जकेकूर- कृषीजीवनगौरवश्री काशिनाथ संभाजी मिरगाळे, मुरूम- शैक्षणिक,चंद्रकांत रत्नू राठोड,बेळंब तांडा- महसूल सेवा,डॉ. महेश महालिंग अर्दाले,लातूर- जीवनगौरव वैद्यकीय,श्री. शिवशरण गुरलिंगप्पा वरनाळे, मुरूम- जीवनगौरव सहकार

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट कथालेखन पुरस्कार डॉ. प्रभाकर शेळके यांना जाहीर



**जालना :** येथील कवी कथाकार नाट्यलेखक डॉ प्रभाकर शेळके यांच्या "डबल ढोलकी" या कथासंग्रहास डॉ बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट कथालेखन पुरस्कार ज्ञानज्योत फाउंडेशन महाराष्ट्र राज्य पुणे व संत गाडगे महाराज विचारमंच महाराष्ट्र राज्य ओतून पुणे संस्थेच्या संयुक्त विद्यमाने संस्थापक अध्यक्ष सौ.कविता काळे, कार्याध्यक्ष सौ.काचंन मून सचिव श्री.रणजित पवार यांनी निवडपत्र पाठवून हा पुरस्कार जाहीर केला आहे.या पुरस्काराचे वितरण येत्या ७जून २०२५ या मृगनक्षत्रावर मान्यवरांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात येणार आहे.यांच्या या यशाबद्दल मराठवाडा साहित्य परिषदेचे कार्यवाह गोदा प्रकाशनांचे प्रकाशक डॉ दादा गोरे, माजी आमदार राजेश भैय्या टोपे सौ मनीषाताई टोपे प्रशासकीय अधिकारी डॉ बाबासाहेब गायकवाड,बसवराज कोरे, डॉ श्रीनिवास सातभाई, डॉ रावसाहेब ढवळे, डॉ.सुहास सदावर्ते कैलास भाले मनीष पाटील सुनील लोणकर दर्द, केशव धांडे,बाबासाहेब ताठे,मच्छिंद्र लांडगे, अनिरुद्ध पावसे भगवान सवळे जालिंदर बटुळे संतोष तांबे. गोतावळ्यातीली सर्व मान्यवरांनी शेळके यांचे अभिनंदन केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २७ मे २०२५


## वाशिम स्थानिक गुन्हे शाखेची ऊत्कृष्ट कामगीरी दिवसा घरफोडीचे ०७ गुन्हे उघड आंतरराज्यीय, अंतर जिल्हा टोळीतील दोन आरोपीच्या आवळल्या मुसक्या




**वाशिम (महेश मुंढे)** वाशिम पोलीस घटकामध्ये जिल्हा पोलीस अधिक्षक श्री अनुज तारे यांनी पदभार स्विकारल्यापासुन त्यांनी संपत्ती विषयक तसेच इतरही गुन्हे घडणार नाहीत, त्याला प्रतिबंध होईल याकरीता विशेष प्रतिबंधक उपाययोजना राबविल्या. त्याकरीता सतत पेट्रोलींग, वेळोवेळी ऑपरेशन ऑल आउट, कोंबीग ऑपरेशन व नाकाबंदी सारख्या विशेष माहिमा राबवुन रेकॉर्डवरील व माहितगार गुन्हेगारांवर सतत पाळत ठेवुन आरोपीतांविरुध्द प्रभावी प्रतिबंधक कार्यवाहया करण्यात आल्या. परीणामी मागील काही वर्षाचे तुलनेत गुन्हयांमध्ये घट आली आहे.

मालमत्तेचे गुन्हे घडलेच तर घडलेल्या गुन्हयांना उघडकीस आणण्यावर भर दिला. त्याकरीता योजना आखल्या विशेष प्रयत्न केले, केलेले सर्व प्रयत्नांचा अहवाल मागवुन सतत आढावा घेतला. संपत्तीविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरीता स्थानिक गुन्हे शाखेला सुचना / आदेश दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेने घडलेल्या गुन्हयांच्या तांत्रीक बाबी तपासुन विश्लेषनात्मक अभ्यास केला. गुन्हेगारांचे रेकॉर्ड, सिसिटीव्ही फुटेज बघुन आरोपींनी घरफोडीकरीता वापरलेल्या पध्दतींचा अभ्यास केल्याने त्यावरुन असे लक्षात आले की, बुलढाणा जिल्हयातील विशीष्ट भागातील घरफोडीचे गुन्हे करणारे गुन्हेगारांच्या टोळया वाशिम, अकोला, अमरावती, बुलढाणा, परभणी, बिड, नाशिक, जळगाव, चाळीसगाव असे महाराष्ट्रातील व मध्यप्रदेश येथील काही जिल्हयांमध्ये सक्रीय आहे. त्यावरुन मागील दोन महिण्यापासुन घरफोडीचे गुन्हेगारांवर सतत पाळत ठेवुन त्यांच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवल्या जात होते. आरोपींना पकडण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे सतत प्रयत्न चालुच होते.

दि.२४.०५.२०२५ रोजी घरफोडीचे गुन्हे करणारे आंतरराज्य टोळीतील गुन्हेगार मालेगाव येथे येत असल्याच्या मिळालेल्या गोपणीय बातमीप्रमाणे अकोला नाका, मालेगाव येथे सापळा रचुन संशयीत इसम १) आकाश प्रकाश पवार वय ३५ वर्ष २) उमेश गटरंग पवार वय २८ वर्ष दोन्ही रा. फत्तेपुर, ता. खामगाव, जि. बुलढाणा यांना कमालीचे प्रयत्न करुन ताब्यात घेतले. त्यांना विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी पो.स्टे. वाशिम येथील अप.क्र. ११२ / २५ अप.क्र. २३९ / २५ अप.क्र. ४१७/२५ अप.क्र. ७५३ / २४ पो.स्टे. रिसोड येथील अप.क्र. ५८१/२४ अप.क्र.१८५ / २४ अप.क्र. ७६ / २४ असे एकुण ०७ गुन्हे त्यांच्या इतर साथीदारासह केल्याची कबुली दिल्याने आरोपीतांकडुन एकुण ५१. २७ ग्रॅम वजनाच्या ०४ सोन्याच्या लगड व १७ तोळे वजनाच्या ०३ चांदीच्या लगड व नगदी १६,००० रुपये असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

घरफोडीचे गुन्हे करणारे आंतरराज्य टोळीतील कुख्यात आरोपी पोलीसांनी पकडुन एकावेळी ०७ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणणे व त्या गुन्हयांमधील चोरीस गेलेली मालमत्ता हस्तगत करणे ही वाशिम जिल्हा पोलीसांकरीता मोठया यशाची व अभिमानाची बाब आहे.

सदर कारवाई मा. श्री अनुज तारे, पोलीस अधिक्षक वाशिम, मा. श्रीमती लता फड, अपर पोलीस अधिक्षक, वाशिम, मा. श्री नवदीप अग्रवाल, सहायक पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनात पोनि स्थागुशा श्री रामकृष्ण महल्ले, सपोनि योगेश धोत्रे, व अंमलदार विनोद सुर्वे, ज्ञानदेव म्हात्रे, अमोल इरतकर, आषिश बिडवे, अविनाश वाढे, शुभम चौधरी, दिपक घुगे, संतोष कंकाळ, संतोष वाघ यांनी सतत कार्यरत राहुन अथक परिश्रम घेवुन गोपनिय माहिती मिळवुन केलेल्या तांत्रीक तपासामुळेच गुन्हे उघडकीस आले आहेत, याबाबत वरीष्ठ पातळीवर सुध्दा दखल घेण्यात आली आहे.






महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २७ मे २०२५

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ऐतिहासिक अनमोल संदेश

**मित्र हो,** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने प्रत्येक आठवड्याला रविवारी साप्ताहिक कार्यशाळा आयोजित केली जाते. ज्यात त्या आठवड्यातील एखाद्या तारखेला आपल्या आदर्श महापुरुषांनी केलेले महत्वपूर्ण विधानाच्या वर्धापनदिनानिमित्त सदरील ऐतिहासिक विधानावर कार्यशाळा आयोजित केली जाते. जेणेकरून ऐतिहासिकदृष्ट्या त्या काळची प्रासंगिकता, वर्तमानातील संदरभीय आवश्यकता आणि भविष्यकालीन उपयोगिता यावर सातत्याने विवेचन केले जात आहे. या कळिचा भाग म्हणून २५ मे २०२५ ला मी माझ्या आयुष्याचे शेवटचे दिवस बुद्ध धर्माच्या प्रसारातच व्यतित करण्याचे ठरविले आहे. या २७ मे १९६३ च्या विधानावरस११२ वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. तेव्हा हे लक्षात आले की त्या दिवशी तर रमाई आंबेडकरांचा स्मृती दिन सुद्धा आहे. त्या निमित्ताने अभिवादन पर थोडक्यात काही बाबी शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनाला आकार देणारी कारुण्य मूर्ती रमाई सुख दु:खाच्या प्रसंगात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसोबत उभी राहिल्याचे अनेक ऐतिहासिक प्रसंगातून पहायला मिळते. साध्या भोळ्या अर्धांगिनीने डॉ. बाबासाहेब आंबेडकराकडे कोणत्याही गोष्टीसाठी हट्ट धरला नव्हता. पतीच्या सुखातच आपले सुख आहे असे मानून, पतीची निष्ठेने सेवा करने ज्यामुळे कौटुंबिक समृद्धी वृद्धींगत होईल या दृष्टीने जीवन कंठण्याचा अंगभूत गुणधर्म तिने पाळला होता. जीवनाला आकार प्राप्त होत असतांना स्थिरावण्याचे दिवस येण्याची शक्यता पहायला मिळत होती, अशातच रमाई मात्र शरीर अस्वास्थ्यामुळे हे जग सोडून जाण्याची भाषा बोलत असे.

त्या क्षणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे काळीज पिळवटून येतांना रडू कोसळायचे, अशावेळी नयनातून कोसळणा-या अश्रूधारा बघून रमाई बाबासाहेबांची समजूत काढताना "तुम्ही धीर सोडू नका! असे हताश होऊ नका! म्हणायची तेव्हा अश्रू पुसून घराबाहेर पडताना रमाईला काळजी घे असा सल्ला देऊनच बाहेर पडायचे. अशा परिस्थितीत मात्र घराबाहेर पडलेले पती सुखरूप घरी परत यावेत याची रमाई ला जास्त चिंता वाटत असे कारण त्या काळात सामाजिक परिस्थितीच तशी होती. परिणामी राजगृहाच्या पायरीवर ती वाट पहात बसायची. उशीरा का होईना घरी आल्यावर बाबासाहेबांचे दर्शनाने चिंता कमी होऊन रमाईला झोप येत असे. १९३४ मध्ये वेरुळच्या दौ-यावरून परतल्यावर चार दिवसांपासून रमाई अंथरुणावर खिळलेली पहायला मिळाली. या काळात रमाईला क्षयाने विळखा घातल्याने दिवसेंदिवस तिची प्रकृती चिंताजनक होत चालली होती. कारण उपचाराला हव्या त्या प्रमाणात शरीर प्रतिसाद देत नव्हता.

त्यामुळे उपचार करणारे डाक्टर सुद्धा हतबल झाले होते. तशाही परिस्थितीत चिंता सोडून प्रकृतीची काळजी घ्यायचा सल्ला देणारे बाबासाहेब पनवेलला मुलांच्या वस्तीगृहाची स्थापना करायला गेले असताना तातडीचा निरोप मिळाल्याबरोबर मुंबई ला परत आले. तेव्हा रमाईचे डोळे खोल गेले होते, आवाज बसला होता, बोलण्याचा प्रयत्न करताना ओठ तेवढे हलायचे पण जिभेची हालचाल होत असली तरी स्वर बाहेर पडण्यासाठी आवश्यक क्षमता संपुष्टात आली होती. हे दृश्य बघून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अंतकरण भरून आले होते. अशाही परिस्थितीत बाबासाहेब उपचार करणा-या डॉॅक्टरांना म्हणाले की, "वाटेल ते करा पण माझ्या "रामू" ला वाचवा." तेव्हा प्रत्युत्तरादाखल डॉॅक्टर म्हणाले की, "आता जास्त दूर कुठे जाऊ नका, काळजी घ्या." या सुचक इशा-याचा अर्थ बाबासाहेब आंबेडकरांना कळला होता. डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे औषधे दिली जात असताना त्राण उरलेले नसताना सुद्धा त्या बोलण्याचा प्रयत्न करीत होत्या. काय सांगायचे असेल बरे त्यांना तर 'यशवंतांना संधीवाताचा आजार आहे. तो अधूनमधून अंथरुण धरतो, त्याची काळजी घ्या.

तेवढाच आपल्या काळजाचा तुकडा उरला आहे. त्याला आईची उणीव भासू देऊ नका! आईची माया द्या!' असे ती सांगू पहात असावी पण काळाने ती परवानगी नाकारली होती. तो संवाद होऊ शकला नाही. शेवटी २७ मे १९३५ ची पहाट राजगृहात काळोखाचे साम्राज्य घेऊनच उजाडली आणि सकाळी ९ :०० वाजता त्याग मूर्ती, कारुण्य मूर्ती यशवंतरावांच्या आई, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रामूचा, वंचित, पीडितांच्या आईचा अंत झाला होता. ज्यामुळे राजगृहावर शोककळा पसरली आणि सारा देश शोकसागरात बुडाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चळवळीसमोरील आव्हाने परतवून लावण्यासाठी प्रदीर्घ लिखाण केले आहे. त्यापैकी एक म्हणजे "THE PARTITION OF INDIA" अर्थात "भारताची फाळणी" हा एक महत्वपूर्ण ग्रंथ होय. हा ग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या सुविद्य पत्नी "रामू" यांना अर्पण केला आहे. त्यात नमूद केल्याप्रमाणे : INSCRIBED TO THE MEMORY of RAMU : As a token of my appreciation of her goodness of heart, her nobility of mind and her purity of character and also for the cool fortitude and readiness to suffer alongwith me which she showed in those friendliness days of want and worries which fell to our lot. आदरांजली अर्पण करताना आपण याचीही जाणीव ठेवली पाहिजे.

१९५३ या वर्षी २७ मे ला बुद्ध जयंती होती. तसेच त्याच दिवशी रमाईचा स्मृती दिन सुद्धा होता. त्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नरे पार्क मुंबई येथे आयोजित सभेत ऐतिहासिक अनमोल संदेश दिला तो असा की, "बौद्ध धर्माचा उपासक असल्याने कृतीशीलतेचा पाईक व्हावे म्हणून मी माझ्या आयुष्याचे शेवटचे दिवस बुद्ध धर्माच्या प्रचारातच व्यतित करण्याचे ठरविले आहे." याची जाणीव ठेवून ज्यांना ज्यांना रमाई, बाबासाहेब, बुद्ध कळला त्यांनी त्यांनी आता या कार्याला वेगाने गतिमान करण्यासाठी प्रयत्न करने हीच खरी रमाईला अभिवादन पर आदरांजली ठरेल. रमाईचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून ज्याप्रमाणे रमाईने जीवन व्यतीत केले त्याप्रमाणे जीवन व्यतीत करून कौटुंबिक, सामाजिक विकास घडवून आणण्याचा भारतीय महिलांनी प्रयत्न केला पाहिजे. त्यांच्यातील सर्व सद्गुण आजच्या महिलांनी अंगिकारून संस्कारीत केले तर परिवारातील सर्व सदस्यांना किमान आंबेडकराईट आंदोलनाचे अनुयायी तरी होता येई.

सदरील संदेशाची पूर्तता करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २४ नोव्हेंबर १९५६ ला सारनाथ येथे आदेशयुक्त संदेश दिला होता की, बौद्धांचे आद्य कर्तव्य आहे की आपण बुद्ध विहारात गेले पाहिजे. तर २५ नोव्हेंबर १९५६ ला बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, माणसा माणसातील संबंध प्रेम, करुणा या तत्त्वानुसार जोडणा-या बौद्ध धर्माचा मध्यवर्ती सिद्धांत 'समता' आहे. तर मग आपण समतामुलक समाज निर्माण करण्यासाठी परिस्थितीनुरूप निर्णय घडवून आणण्यासाठी आपण दर रविवारी बुद्ध विहारात जाऊन बाबासाहेब आंबेडकरांच्या आदेशयुक्त संदेशाचे पालन करून पुढील पिढी घडविण्यासाठी आपल्या अपत्यावर तसे संस्कार करीत आहोत काय? असा प्रश्न स्वत:ला विचारून कुटुंबासह बुद्ध विहारात गेले पाहिजे. हीच खरी या प्रसंगी रमाईला आदरांजली ठरेल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

जय रमाई!!!

**लेखक : मेश्राम बी. बी.**
संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल,
नॅशनल कौन्सिल मेंबर ऑफ दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना)
संपर्क : ९४२१६७८६२८
stdbbm@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002